ePaper

**‘डूब गये अहंकार मे सारे, अब तो सुधर जावो प्यारे...’, शिंदेंची यवतमाळमध्ये जोरदार फटकेबाजी**



वर्ष - 8 । अंक - 254 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 4 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- हैदराबादचा इतिहासातील मोठा पराभव
- ‘राहुल’ प्रकरणाची संजीवकडून पुनरावृत्ती
- चीनने ४,००० किमी जमीन बळकावली
- कोल्हापूरच्या मंदिरावर वक्फचा दावा


### हॉस्पिटलला रुग्णाच्या जीवापेक्षा पैसा प्यारा ?

# वा, दीनानाथ ! गर्भवती अनाथ !!

## माणुसकीला कलंक, संवेदनशीलताच नाही

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुण्यातील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाच्या मस्तवाल आणि मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली असून या हॉस्पिटलवर तातडीने गुन्हा दाखल करण्यात यावा आणि संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. आमदार अमित गोरखे यांच्या पीएच्या पत्नीच्या नशिबी असा दुर्दैवी प्रसंग यावा, याबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.**











**आमदार अमित गोरखे यांच्या पीए च्या पत्नीला एवढी तुच्छतेची वागणूक, गोरगरिबांचे काय ?**

### प्रसुती कळा अन्...

पुण्यातील अतिशय प्रतिष्ठित असलेल्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या प्रशासनाने गर्भवती महिलेकडे दहा लाखांची मागणी केली होती. प्रसुतीच्या कळा सुरू झाल्यावर या महिलेस दीनानाथ हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. हातात असलेले अडीच लाख भरायला तयार असतानाही या महिलेला दाखल करून घ्यायलाही हॉस्पिटलचे पदाधिकारी तयार झाले नाहीत. आधी दहा लाख रुपये भरा आणि मग हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हा, असे तेथील पदाधिकाऱ्यांनी सुनावले. या महिलेचा नाईलाज झाला आणि इतर हॉस्पिटल्सची शोधाशोध सुरू झाली.

### अन्य हॉस्पिटलमध्ये हलविले, पण..

दीनानाथाने नकार देताच या गर्भवती महिलेला अन्य हॉस्पिटल्समध्ये हलवत असताना भरपूर त्रास झाला. अखेर जुळ्या मुलांना जन्म देऊन त्या बिचाऱ्या महिलेला मृत्यूने गाठले. तनिषा सुशांत

दीनानाथ हॉस्पिटलचा संपूर्ण राज्यात एक मोठा दरारा आहे. कोणत्याही दुर्धर आजारावर आधुनिक उपकरणे आणि प्रगत तंत्रज्ञानासोबत निष्णात डॉक्टरांसाठी या हॉस्पिटलची ख्याती आहे. मात्र, आता या हॉस्पिटलला पैसा प्यारा आहे का? असा प्रश्न प्रत्येक रुग्णाला पडला, तर नवल वाटून देऊ नये.

### नेमके काय घडले?

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाच्या मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला आहे. प्रसुतीचा त्रास होत असणाऱ्या तनिषा भिसे यांना दाखल करण्यासाठी आणण्यात आले होते. मात्र, उपचारासाठी हॉस्पिटल प्रशासनाने रुग्णाला दहा लाख रुपयांची मागणी केली.

### महिलेचे पती आ.अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक

इतके पैसे अचानक कसे आणायचे, असा प्रश्न गर्भवती महिलेच्या कुटुंबीयांना पडला. अखेर अडीच लाख भरायला तयार असतानाही रुग्णालय प्रशासनाने या गर्भवती महिलेला दाखल करून घेतले नाही. परिणामी तिला इतर रुग्णालयात हलवण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. या महिलेचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत.

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मधून कॉल

पत्नीला दाखल करून घेत नाहीत, म्हटल्यावर दीनानाथला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रामेश्वर नाईक यांनी फोन केला. तरीही रुग्णालय प्रशासनाने त्यांचे ऐकले नाही.

### गोंडस जुळ्या मुलांना जन्म आणि आईचा मृत्यू..

परिणामी गर्भवती महिलेने गोंडस जुळ्या मुलांना जन्म दिला. मात्र, या महिलेचा जीव मात्र गेला. या घटनेबाबत आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रारही केली आहे. या हॉस्पिटलविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येऊन संबंधित पदाधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, ही मागणी पुढे येऊ लागली आहे.

### हॉस्पिटलबाबत काही अनुत्तरीत प्रश्न..

एका आमदाराच्या पी ए च्या पत्नीला अशी वागणूक मिळत असेल तर गोरगरिबांचे काय ? अशा घटनेनंतर समाजात उमटणारा तात्पुरता आक्रोश उपयोगाचा नाही. खासगी रुग्णालयांवर नियंत्रण आणायला हवेच..

### चळवळीचे कार्यकर्ते आवाज उठवतात, त्यांना समाजाकडून कितपत प्रतिसाद मिळतो?

आपण लोकप्रतिनिधींचे घर गाठून त्यांना कधी जाब विचारण्याच्या फंदात पडतो का? रुग्णांवर उपचार करण्यास नकार दिल्यामुळे रुग्ण हक्काचे उल्लंघन झाले आहे. महापालिका अधिकारी झोपले आहेत का? स्वतःहून त्यांनी कारवाई का केली नाही? खासगी हॉस्पिटलची मुजोरी उखडून टाकायची असेल तर सरकारी हॉस्पिटल सक्षम करणे हा पर्याय दिसतो. समाज त्याकडे गांभीर्याने पाहतो का ?

# पुणे आयटी पार्कमधील कोंडी सुटणार!

## उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांचे 650 कोटींचे प्रकल्प लवकरच

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.**




त्यामुळे भविष्यात आयटी पार्कमधील कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. आयटी पार्कमध्ये वाहनांची संख्या गेल्या काही वर्षात प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे सध्याचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे. त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार केले जाणार आहेत. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात सातत्याने वाहतूककोंडीचे होते. ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल. या दोन्ही रस्त्यांच्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहेत. याचबरोबर काही भूसंपादन करावे लागणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ही जागा संपादित करून 'एमआयडीसी'ला देणार होता. परंतु, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते. यामुळे या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी 'एमआयडीसी'कडून प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे.

त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार केले जाणार आहेत. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात सातत्याने वाहतूककोंडीचे होते. ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल. या दोन्ही रस्त्यांच्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहेत.

### 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते.

# मिळकतकराच्या बिलांचे वाटप १ मे पासून

## 30 जूनपर्यंत मिळकतकर भरता येणार: प्रतिभा पाटील यांची माहिती

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील नागरिकांना चालू आर्थिक वर्षाच्या (२०२५-२६) मिळकतकर बिलांचे वाटप एक मे पासून सुरू केले जाणार आहे. निवासी मिळकतींना ४० टक्के सवलत देण्यासाठी महापालिकेकडून भरून घेण्यात आलेल्या पीटी-३ अर्जाची छाननी करून त्याच्या नोंदी प्रलंबित असल्याने १ एप्रिलपासून बिलांचे वाटप करणे अशक्य आहे.**



त्यामुळे एक मे पासून नागरिकांना बिले दिली जातील, असे महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी सांगितले. नागरिकांना ३० जूनपर्यंत पाच ते दहा टक्के सवलतीचा फायदा घेऊन ३० जूनपर्यंत मिळकतकर भरता येणार असल्याचेही पाटील यांनी स्पष्ट केले.महापालिकेचे आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर एक एप्रिलपासून मिळकतकरदारांना बिलांचे वाटप केले जाते. त्यानंतर ३१ मे पर्यंत महापालिकेने जाहीर केलेल्या योजनांचा फायदा घेऊन नागरिकांना सर्वसाधारण करात पाच ते दहा टक्के सवलतीचा फायदा घेत मिळकतकर भरता येतो.

ज्या मिळकतींमध्ये जागामालक स्वत: राहत असतील अशा नागरिकांना राज्य सरकारच्या आदेशानुसार ४० टक्के सवलत दिली जाते. यासाठीचे पीटी-३ क्रमांकाचे अर्ज महापालिकेने नागरिकांकडून भरून घेतले आहेत. सर्वसाधारण दीड ते पावणेदोन लाख अर्ज महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांकडे नागरिकांनी भरून दिलेले आहे.महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडे मनुष्यबळ नसल्याने याच्या नोंदी करणे अद्यापही बाकी आहे. त्यातच गेल्या दोन महिन्यांपासून मिळकतकर विभागातील कर्मचारी उत्पन्नवाढीच्या कामात अडकल्याने हे काम रखडले आहे. काढल्यास नागरिकांना त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेत हेलपाटे मारावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आलेल्या अर्जांची तपासणी करून त्याच्या नोंदी करून त्यानंतरच बिले काढण्याचा निर्णय मिळकतकर विभागाने घेतला आहे.

### 40 टक्के सवलत देण्याचे अर्ज प्रलंबित

त्यामुळे एका महिन्यात ही संपूर्ण कामे पूर्ण करून एक मे पासून बिलांचे वाटप सुरू केले जाणार आहे. यासाठी महापालिका आयुक्तांची मान्यता देखील घेण्यात आल्याचे उपायुक्त पाटील यांनी सांगितले. नागरिकांना ४० टक्के सवलत देण्याचे अर्ज प्रलंबित असल्याने एक मे पासून मिळकतकराची बिले दिली जाणार आहेत. नागरिकांनी सवलतीचा फायदा घेऊन वेळेत मिळकतकर भरावा.

## पिंपरी-चिंचवडमधील डुडूळगाव येथील प्रस्तावित

# ‘इको टुरिझम पार्क’ला वन मंत्र्यांचा ‘बुस्टर’!

### भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरवा : वन मंत्री गणेश नाईक यांचा सकारात्मक प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील मौजे डुडूळगाव येथे प्रस्तावित “इको टुरिझम पार्क”साठी आवश्यक त्याची निधीची उपलब्धता करुन देण्यात येईल. तसेच, महानगरपालिका आणि वन विभाग यांच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्राला चालना देणारा हा प्रकल्प विकसित करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहे.**



वन विभागाशी संबंधित विविध मुद्यांवर बैठक नियोजित करावी, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यानुसार, मंत्रालय येथे वनमंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी वडगावशेरीचे आमदार बापुसाहेब पठारे, संबंधित विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पिंपरी-चिंचवड टिंबर मर्चट्स अँड मॅन्युफैक्चरर्स असोसिएशनच्या राज्यस्तरीय बैठकीत दि.21 ऑगस्ट 2023 रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे लाकूड उपलब्धता अहवाल प्राप्त करुन असोसिएशनच्या सभासदनांना आरा गिरण्यांना परवानगी मिळावी, अशी मागणी करण्यात आली. त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचना वनमंत्र्यांनी दिली.

तसेच, मौजे डुडुळगाव येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे शेकडो वर्षांपासून स्थानिक नागरिकांचे वास्तव्य आहे. सदर जागा वन विभागाच्या हद्दीत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पायाभूत सोयी-सुविधा देता येत नाहीत. सबब, आण्णाभाऊ साठे नगरमध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची परवानगी वन विभागाने महानगरपालिका प्रशासनाला द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली. यावर महानगरपालिका प्रशासनाने पाठवलेल्या प्रस्तावानुसार, वन विभागाच्या हद्दीत वर्षानुवर्षे वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या पायाभूत सोयी-सुविधा देण्यास ना हरकत दाखला द्यावा, असेही निर्देश वनमंत्री नाईक यांनी दिले आहेत.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, मौजे डुडूळगावमधील अण्णाभाऊ साठेनगर ग्रामपंचायतपासून वनविभागाच्या जागेत आहे. या भागातील नागरीकरांना स्वत:च्या घराची नोंदणी करता येत नाही. तसेच, या भागात पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करता येत नाही. वन विभागाची हद्द लागून असल्यामुळे येथील 18 मीटर रोडच्या बाजुला परिसराचा विकास करता येत नाही. आता वनमंत्र्या दिलेल्या आश्वासनामुळे या रस्त्याच्या विकासाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

> “ स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील समाविष्ट गाव डुडूळगावमध्ये पर्यटन व स्थानिक नागरिकांना सुविधा अशा संकल्पनेतून दुर्गा टेकडी, निगडीच्या धर्तीवर “इको टुरिझम पार्क” विकसित करता येईल, अशी भौगोलिक रचना आहे. या पार्कसाठी महानगरपालिका प्रशासनाने सल्लागार नियुक्त करावा. सदर कामासाठी वन विभागाने विविध योजनांमधून निधी उपलब्ध करुन कामाचे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहेत. तसेच, वन विभागाच्या हद्दीतील रस्त्यांचा प्रश्नही मार्गी लाणार आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## भाजप आमदाराच्या पीएच्या गर्भवती पत्नीचा मृत्यू

# 10 लाख भरा तरच उपचार करू, मंत्रालयातून फोन.. तरी रुग्णालय ऐकेना

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सांस्कृतिक राजधानी आणि सामाजिक जाणीवा असलेल्या पुण्यातील दीनानाथ मंगेशकर या धर्मादाय नोंदणी असलेल्या रुग्णालयातच रुग्णसेवेला तडा गेला असून गर्भवती महिलेवर वेळीच उपचार न केल्याने तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.**







एका गर्भवती महिलेला पुण्यातील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करतेवेळी अगोदर १० लाख रुपये भरावे, त्यानंतरच दाखल केले जाईल अशा पवित्रा रुग्णालय प्रशासनाने घेतला होता. त्यामुळे, संबंधित महिलेला दुसऱ्या रुग्णालयात उपचारासाठी, प्रसुतीसाठी दाखल करण्यात आले. मात्र, दोन जुळ्या मुलींना जन्म दिल्यानंतर दुर्दैवाने महिलेचा मृत्यू झाला. या घटनेवरुन आता सर्वत्र संताप व्यक्त होत असून आमदार अमित गोरखे यांनीही याप्रकरणी पोलिसात धाव घेतली आहे.

तनिषा भिसे यांना पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणण्यात आले होते. मात्र उपचारासाठी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाने रुग्णाच्या नातेवाईकांकडे १० लाख रुपयांची मागणी केली. इतके पैसे अचानक कसे आणायचे असा प्रश्न गर्भवती महिलेच्या कुटुंबीयांना पडला. अखेर अडीच लाख भरायला तयार असतानाही रुग्णालय प्रशासनाने गर्भवती महिलेला प्रसुतीसाठी दाखल करून घेतलं नाही. परिणामी तिला इतर रुग्णालयात हलवण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. दुसऱ्या रुग्णालयात हलवत असताना महिलेला त्रास झाला. या महिलेचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. रुग्णालयात पत्नीला दाखल करून घेत नाहीत म्हणल्यावर दीनानाथ रुग्णालयाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रामेश्वर नाईक यांनी फोन केला. तरीही रुग्णालय प्रशासनाने त्यांचं ऐकलं नाही. परिणामी गर्भवती महिलेने दोन गोंडस जुळ्या मुलांना जन्म दिला मात्र महिलेचा जीव गमावला. या घटनेबाबत आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रारही केली आहे.

### आमदाराची पोलिसात धाव, गुन्हा दाखल करण्याची मागणी

विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी घेतली पुण्याचे सहपोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांची भेट घेऊन महिला भिसे यांच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. गोरखे यांनी घटनेचा सर्व वृतांत सविस्तर पोलीस उपायुक्त रंजन शर्मा यांना सांगितला. त्यानंतर, योग्य ती कायदेशीर कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यात येईल असे, आश्वासन शर्मा यांनी आमदार गोरखे यांना दिले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संतांना कसे ओळखावे ?

धान्यामध्ये काही खडे असे असतात की, धान्यापासून ते वेगळे निवडता येत नाहीत. तांदळांत पांढरे खडे असतात, ते निवडू गेले तरी निवडले जात नाहीत. त्याप्रमाणे साधू लोक हे आपल्यात असतात, त्यांना पाहू गेले तर ते आपल्यासारखेच संसारात वावरत असलेले दिसतात; पण खरे पाहता ते आपल्यापेक्षा वेगळे असतात. पुस्तकांतून साधूची लक्षणे पुष्कळ दिलेली असतात. पण त्याप्रमाणे आपण पाहू गेलो तर साधू ओळखता येईलच असे नाही. साधूचे एकच अचूक लक्षण सांगता येईल, ते हे की, जो सर्व ठिकाणी देवाला पाहू शकतो तो साधू. पण एवढ्यावरून आपल्याला तो ओळखता येईल का ? नाही; तर जेव्हा आपण साधू व्हावे, तेव्हाच आपल्याला साधूला ओळखता येईल.

जगात आपण कुणाचीच निंदा करू नये. आपण जेव्हा दुसऱ्याचे दोष पाहतो, म्हणजेच ते जेव्हा त्याच्याजवळ आहेत असे दिसतात, त्या वेळेस तेच दोष आपल्याजवळ सूक्ष्म रूपाने असतात असे समजावे; आणि आपण लगेच देवाला शरण जाऊन, 'हे माझे दुर्गुण काढून टाक', म्हणून त्याची करुणा भाकावी, आपण जेव्हा 'जगात न्याय उरला नाही' असे म्हणतो, त्या वेळेस आपल्याजवळ तो दोष आहे समजावे. म्हणून आपण कुणाचे दोष पाहू नयेत. आपण आपल्या स्वतःला आधी सुधारावे. चित्तशुद्धी केल्याशिवाय आपल्या मनात सर्व ठिकाणी भगवद्भाव उत्पन्न होणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, तेव्हा आपलेच चित्त अशुद्ध आहे असे समजून आपण परमात्म्याची करुणा भाकून त्याला शरण जावे, आणि 'माझे चित्त शुद्ध कर' अशी त्याला विनंती करावी. असे केले म्हणजे आपले चित्त शुद्ध होत जाते, आणि मग भगवंताची प्राप्ती व्हायला वेळ लागत नाही.

जे मिश्रण आहे ते पचायला कठीण असते; उदाहरणार्थ, भाजणी. मिश्रण नसलेले एकच शुद्ध अन्न पचायला सोपे असते. हे जसे खरे, त्याचप्रमाणे आपले अंतःकरण अगदी शुद्ध असावे, म्हणजे ते सर्वांमध्ये लवकर मिसळते. पण आपल्या अंतःकरणामध्ये स्वार्थाचे मिश्रण असल्यामुळे ते सर्वांमध्ये समरस होऊ शकत नाही. शुद्ध अंतःकरणाच्या माणसाचे चालणे हळू, आणि बोलणे मृदू असते. तो सर्वांना प्रिय होतो. जगातले आपले समाधान किंवा असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून असते. 'माझ्याकरिता मी नसून, मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे,' ही वृत्ती आपण ठेवावी.

**बोधवचन:- सर्व चराचर भगवद्रूप जो पाहतो तो साधू.**

# गोंधळलेला नेता : टोले खातो, जाता जाता !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**देशामध्ये कोणतीही घटना घडो, त्यावर प्रतिक्रिया देणे, हा जन्मसिद्ध हक्क असल्यासारखे उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत मानतात. त्याचप्रमाणे, हल्ली काय झाले आहे, स्वतः उद्धव ठाकरे हेच मीडियाला सामोरे जातात आणि पूर्ण अभ्यास नसल्यामुळे अनेकदा उघडे पडतात. त्यामुळे त्यांचे तेच तेच डायलॉग पुढे येऊ लागतात ! एक गोंधळलेला नेता, म्हणून आजकल उद्धव ठाकरे यांची प्रतिमा होऊ लागली आहे. शेवट व्हायचा तोच होतो, विरोधकांचे फटकारे खाण्याचे त्यांच्या नशिबी येते.**



### अर्थसंकल्पापासून 'वक्फ' पर्यंत

कोणताही विषय असला तरी त्याचा अभ्यास नसताना, त्यावर अधिकारवाणीने बोलण्याचा हक्क आपल्याला मिळाला आहे, असे उद्धव ठाकरेंना वाटत असावे. त्यांनी कधी अभ्यासपूर्ण आणि मुद्द्याला धरून भाषण केले आहे, असे कधीच घडलेले नाही. त्यामुळे देशाच्या अर्थसंकल्पापासून ते सध्याच्या वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकापर्यंत ते कशावरही बोलू शकतात. हिंदुत्वावर बोलण्यासाठी तर त्यांच्याकडे प्रचंड मुद्दे असतात, तो भाग वेगळा !

### सभागृहात काय बोलणार ?

वास्तविक, उद्धव ठाकरे हे विधान परिषद सदस्य आहेत. पण, कामकाजामध्ये हिरीरीने भाग घेणे आणि एखादा अभ्यासपूर्ण विषय मांडणे, हे त्यांच्या रक्तात किंवा कार्यपद्धतीत बसत नसावे. सभागृहात न जाताच ते पत्रकार परिषदेत रमतात आणि एखादा मुद्दा असा देतात, की त्यावर त्यांचे विरोधक अक्षरशः तुटून पडतात. आपल्याला अर्थसंकल्पातील काहीही कळत नाही, ही त्यांनी प्रांजलपणे दिलेली कबुली सर्वांना आवडली होती. पण, नंतर केंद्रीय अर्थसंकल्पासंदर्भात त्यांनी पत्रकार परिषद घेऊन जे अज्ञान प्रगट केले, त्याला मात्र तोड नव्हती !

### ठाकरेंचे वार ; शिंदेंचे पलटवार !

संसदेमध्ये सध्या वक्फ बोर्डावर जोरदार खडाजंगी सुरू आहे. या कायद्याला विरोध करण्याचे धोरण हा अजेंडा उबाठा गटाचा आहे. पण, तो मुद्दा धरून भाजपावर हल्लाबोल करण्याऐवजी पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी त्यांच्यातून फुटून बाहेर पडलेल्या एकनाथ शिंदे यांच्यावर हल्ला चढवला. मूळ मुद्दा राहिला बाजूला, ठाकरे यांचे वार आणि एकनाथ शिंदे यांचे पलटवार, हे चांगलेच गाजले !

### उद्धव ठाकरे यांची चौफेर टोलेबाजी..

उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत भाजपाप्रणित केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे नेहमीचे टार्गेट असलेल्या भाजपावर जोरदार टीका केली. मूळ मुद्द्याला बगल देत नेहमीच विषयांतर करून बोलण्याचा ठाकरेंच काय त्यांच्या सर्व चेल्यांचा हातखंडा आहे, हे सर्व जण जाणून आहेतच.

### नरेंद्र मोदी सरकारला घेरले !

ठाकरे यांनी वक्फ विधेयकाच्या मुद्द्यावरून मोदी सरकारला चांगलेच घेरले. विधेयकात काही चांगल्या गोष्टी आहेत, पण आमचा ढोंगीपणाला विरोध आहे, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार शाब्दिक हल्ला चढवला. भाजपावर बोलणे, यासाठी ती पत्रकार परिषद नसावी. त्यांचा खऱ्या अर्थाने मुद्दा असावा, तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डिवचण्याचा ! सर्वजण उद्धव ठाकरे यांचा उल्लेख 'उबाठा' असा करतात, त्या प्रकारे एकनाथ शिंदे यांचा उल्लेख एकनाथ संभाजी शिंदे म्हणजेच 'एसंशी' असा करून त्यांच्यावर निशाणा साधला. त्यामागील नेमका हेतू काय होता हे आत्ता स्पष्ट झाले नसले, तरी एकनाथ शिंदे यांनी मात्र त्यांचा चांगलाच समाचार घेतला, हे नक्की !

### पत्रकार नेहमीप्रमाणे तयारच..

बातम्यांना मुद्दे मिळतात, असे पत्रकारांच्या जेव्हा लक्षात येते तेव्हा त्यांच्या हालचालींना वेग येतो. उद्धव ठाकरे यांनी आरोप केले, हे कळताच पत्रकारांनी धाव घेतली ती थेट एकनाथ शिंदे यांच्याकडे.. त्यांच्या प्रतिक्रियेसाठी ! नेहमी सौम्य असणाऱ्या शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या भूमिकेवर जहरी टीकास्त्र सोडले. उद्धव ठाकरे माझा उल्लेख 'एसंशी' असा करत आहेत आणि सातत्याने गद्दार म्हणत आहेत. मग, मी त्यांचा उल्लेख 'यूटी' म्हणजेच 'यूज अँड थ्रो' असा करू का?, थोडक्यात, वापरा आणि फेकून द्या, अशी त्यांचीच नीती आहे, असे म्हणताच पत्रकारांमध्येही अशा पिकला !

### हलक्यात घेऊ नका : शिंदे

एकनाथ शिंदे यांनी मूळ शिवसेनेत मोठी फूट पाडून नंतर न्यायालयीन लढतीत शिवसेना पक्ष आणि चिन्ह मिळवले. त्यांनी ताकद दाखवली आहे. पण, तरीसुद्धा मला बोलायला लावू नका, मला हलक्यात घेऊ नका, अशी तंबी ते नेहमी उद्धव ठाकरे यांच्या गटाला देत असतात. यावेळी देखील मला बोलायला लावू नका, माझ्याकडे भरपूर काही आहे. मी शांत आहे, मला शांतपणे काम करू द्या, असा इशारा वजा तंबी शिंदे यांनी दिली आहे.

### गद्दार,खोके शब्द..मनाला डसलेले..

शिंदे एवढ्यावर थांबले नाहीत तर मनातील खदखद त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, की तुम्ही मला गद्दार म्हणता, खोके-खोके म्हणून टीका करता. पण, महाराष्ट्रातील जनतेने तुम्हालाच खोक्यात बंद केले. तुम्ही १०० जागा लढवल्या आणि २० जागा जिंकल्या, तर आम्ही ८० जागा लढवल्या आणि ६० जागांवर विजय मिळवला. महाराष्ट्रातील जनतेने गद्दार कोण आणि खुद्दार कोण ? याचा फैसला गेल्या विधानसभा निवडणुकीतच केला आहे, हे लक्षात घ्या आणि अंतर्मुख व्हा !

### गद्दार, खोके, खंजीर, हिंदुत्व..?

उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि वक्फ विधेयकावर बोलण्यासाठी पत्रकार परिषद घेतली. पण, मुद्दा भरकटत गेला आणि त्यांचे वार हे एकनाथ शिंदेंवर बसले. वास्तविक, त्याच त्याच मुद्द्यांवर उद्धव ठाकरे किती दिवस बोलणार? आम्हाला हिंदुत्व शिकवू नका, बाळासाहेबांचे रक्त आहे धमन्यात, गद्दार, खोके खंजीर, पक्ष चोरला, चिन्ह चोरले, न्यायालयावर विश्वास नाही, जनतेच्या न्यायालयात जाऊ, हिम्मत असेल तर निवडणुका घ्या, त्या बॅलेट पेपरवर घ्या, महाराष्ट्र मराठी माणसाचा अपमान, सर्वस्व गुजरातला पळवले..एवढ्या शब्दांच्या भांडवलावर ते किती दिवस प्रहार करणार ? मग, एखादा खोचक प्रश्न विचारला गेला तर त्यांची भंबेरी होते आणि गोंधळलेला नेता कसा असावा, याची प्रचिती येते, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# काही सातबारे रामाच्या नावावर!

## आम्ही कोणत्याही राष्ट्राचे गुलाम होणार नाही : जितेंद्र आव्हाड

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ सुधारणा विधेयकावरुन लोकसभेत १२ तास चर्चा झाली. त्यानंतर आता राज्यसभेत चर्चा सुरु आहे. दरम्यान या विधेयकावरुन विविध प्रतिक्रिया येत आहेत. संजय राऊत, उद्धव ठाकरे यांनी वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध दर्शवला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही या विधेयकाला विरोध दर्शवला आहे. आज तर त्यांनी काही सातबारे रामाच्या तर काही विठ्ठलाच्या नावावर आहेत असंही म्हटलं आहे.**



आम्ही कोणत्याही राष्ट्राचे गुलाम होणार नाही हे त्यांचं धोरण होते. रशिया आणि अमेरिका यांच्यापासून नेहरु दोन हात लांब राहिले. त्यामुळे परराष्ट्र नीतीचे शिल्पकार म्हटलं जातं. वक्फवरुन सध्या खोटं बोललं जातं आहे. वक्फची जमीन कुणाचीही जमीन नाही. या जमिनी दानात दिल्या गेलेल्या जमिनी आहेत. राजे-महाराजांच्या जमिनी आहेत. त्या वक्फ झाल्या आहेत.आपल्याकडे देवस्थानांच्या जमिनी आहेत, काही सातबारे विठ्ठलाच्या नावावर आहेत, काही रामाच्या नावावर आहेत. काही पांडुरंगाच्या नावावर आहेत. या देवस्थानांच्या जमिनी आहेत. त्यांची विल्हेवाट लावता येत नाही. अर्थात महाराष्ट्रात देवस्थानाच्या जमिनी खाल्ल्याचेही प्रकार महाराष्ट्रात घडले आहेत. कुणी त्या जमिनी खाल्ल्या आहेत ते सगळ्यांना माहीत आहेत. देवस्थानांच्या जमिनींची लूटमार कुणी केली ती नावंही आम्ही सांगू. आमचे हात स्वच्छ आहेत त्यामुळे आम्ही हे बोलू शकतो असंही आव्हाड म्हणाले. वक्फ बोर्डाच्या जमिनी समजून घ्या, या जमिनी श्रीमंत मुस्लिमांनी आपल्या समाजाच्या हितासाठी, धर्मकार्यासाठी, शिक्षणासाठी आणि गरीब मुस्लिमांचा फायदा व्हावा या उद्देशाने दिलेल्या जमिनी आहेत. या काही सरकारने त्यांना कधीकाळी दिलेल्या जमिनी नाहीत. त्यांच्या जमिनी आहेत तर आहेत. ताजमहाल वक्फची जमीन आहे. सरकारकडून अपेक्षा काय असते? तर ज्या जमिनी दान दिल्या आहेत त्या कुणी खाण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांना रोखलं पाहिजे. कुठल्याही धर्माच्या जमिनी राखून ठेवल्या पाहिजेत आणि त्या समाजहितासाठीच वापरल्या पाहिजेत असंही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. देशात धर्मद्वेष इतका पेरतो आहोत की त्यासाठी सगळी माध्यमं कमी पडू लागली आहेत. आपल्याला यादवीकडेच देश न्यायचं असेल तर कोण काय करणार? असंही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.रशिया आणि अमेरिका यांच्यापासून नेहरु दोन हात लांब राहिले. त्यामुळे परराष्ट्र नीतीचे शिल्पकार म्हटलं जातं. वक्फवरुन सध्या खोटं बोललं जातं आहे. वक्फची जमीन कुणाचीही जमीन नाही. या जमिनी दानात दिल्या गेलेल्या जमिनी आहेत. राजे-महाराजांच्या जमिनी आहेत. त्या वक्फ झाल्या आहेत. आपल्याकडे देवस्थानांच्या जमिनी आहेत, काही सातबारे विठ्ठलाच्या नावावर आहेत, काही रामाच्या नावावर आहेत. काही पांडुरंगाच्या नावावर आहेत. या देवस्थानांच्या जमिनी आहेत. त्यांची विल्हेवाट लावता येत नाही. अर्थात महाराष्ट्रात देवस्थानांच्या जमिनी खाल्ल्याचेही प्रकार महाराष्ट्रात घडले आहेत. कुणी त्या जमिनी खाल्ल्या आहेत ते सगळ्यांना माहीत आहेत. देवस्थानांच्या जमिनींची लूटमार कुणी केली ती नावंही आम्ही सांगू. आमचे हात स्वच्छ आहेत त्यामुळे आम्ही हे बोलू शकतो असंही आव्हाड म्हणाले.वक्फ बोर्डाच्या जमिनी समजून घ्या.

### गरीब मुस्लिमांचा फायदा व्हावा

या जमिनी श्रीमंत मुस्लिमांनी आपल्या समाजाच्या हितासाठी, धर्मकार्यासाठी, शिक्षणासाठी आणि गरीब मुस्लिमांचा फायदा व्हावा या उद्देशाने दिलेल्या जमिनी आहेत. या काही सरकारने त्यांना कधीकाळी दिलेल्या जमिनी नाहीत. त्यांच्या जमिनी आहेत तर आहेत. ताजमहाल वक्फची जमीन आहे. सरकारकडून अपेक्षा काय असते? तर ज्या जमिनी दान दिल्या आहेत त्या कुणी खाण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांना रोखलं पाहिजे. कुठल्याही धर्माच्या जमिनी राखून ठेवल्या पाहिजेत आणि त्या समाजहितासाठीच वापरल्या पाहिजेत असंही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. देशात धर्मद्वेष इतका पेरतो आहोत की त्यासाठी सगळी माध्यमं कमी पडू लागली आहेत.

# “यूटी म्हणजे यूज अँड थ्रो म्हणायचं का?

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं उद्धव ठाकरेंना खोचक उत्तर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंचा उल्लेख आज पुन्हा एकदा एसंशिं असा केला आणि त्यांना गद्दार म्हटलं. तसंच भाजपावर टीका करत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध केला. या सगळ्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना विचारलं असता त्यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. तुमचा शॉर्टफॉर्म युटी होतो म्हणजे युज अँड थ्रो म्हणायचं का असा खोचक प्रश्नही एकनाथ शिंदेंनी विचारला.**




बुधवारचा दिवस हा खऱ्या अर्थाने उबाठासाठी दुर्दैवी होता. वक्फ बोर्ड बिल आणि हिंदुत्वाचा संबंध नाही. ते म्हणतात की आमचा वक्फ बिलाला विरोध नाही भाजपाच्या ढोंगीपणाला विरोध आहे. अतिशय गोंधळलेल्या परिस्थितीत ते आहेत. काय बोलायचं, काय करायचं हे सुचत नसलेल्या स्थितीत उबाठा नेतृत्व दिसतं. धरलं तर चावतंय, सोडलं तर पळतंय अशी त्यांची अवस्था झाली आहे असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.एकनाथ शिंदे म्हणाले देशभक्त मुस्लिमांना बाळासाहेब ठाकरेंचा पाठिंबा होता. तिच भूमिका शिवसेनेची म्हणजे आमची तर आहेच पण भाजपाचीही आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदींचीही भूमिका आहे. देशावर प्रेम करणाऱ्या मुस्लिमाला पाठिंबा आहे. देशविरोधी कृत्य करणारे कुणीही असो त्यांना विरोध आहे. हीच भूमिका वक्फ बोर्ड विधेयकाच्या माध्यमातून भाजपाने दाखवली. पण राहुल गांधींची सावली मिळाल्याने उबाठाला वारंवार जिनांची आठवण येते हे दुर्दैव आहे. आता त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. काय करायचं ते उद्धव ठाकरेंना सुधरत नाही.उद्धव ठाकरेंनी आज पत्रकार परिषद घेतली खरं म्हणजे अब्रू काढून घेण्यासारखंच आहे. वक्फ बोर्ड बिल आणल्याने काही मूठभर लोकांच्या हातात लाखो, करोडो एकर जमीन होती त्यांना चाप बसणार आहे. काँग्रेसच्या काळात जागा डीनोटिफाय करुन काही लोकांच्या घशात घातल्या. आता असं कुठलंही कृत्य करता येणार नाही. या जागांवर आता रुग्णालयं, शाळा होतील, लोकपयोगी कामं होतील. उद्धव ठाकरे म्हणाले हे भाजपाचं लांगूलचालन आहे. एकीकडे म्हणाले मुस्लिमांच्या बाजूने बोलत आहेत. उद्धव ठाकरेंना काय म्हणायचं तेच कळत नाही. गोंधळलेल्या अवस्थेत नेतृत्व गेलं की पक्षाचा इतिहास होतो असंही एकनाथ शिंदे म्हणाले. आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंचे विचार पुढे घेऊन जात आहोत.

### यू.टी म्हणजे काय युज अँड थ्रो का?

उद्धव ठाकरेंनी २०१९ ला खुर्चीसाठी जी तडजोड केली जी चूक केली जो अपराध केला त्यापेक्षा मोठा अपराध हा बुधवारी केला. दरम्यान उद्धव ठाकरे तुमचा उल्लेख एसंशि करत आहेत. एकनाथ संभाजी शिंदे. बरं, शॉर्टकट मी असं म्हणू का की त्यांचा शॉर्टकट यु.टी. म्हणजे युज अँड थ्रो. वापरा आणि फेका ही त्यांची नीती आहे.

# चीनने 4,000 किमी जमीन बळकावली!

## विरोधी पक्षनेते राहुल गांधींच्या टीकेनंतर भाजपाचा पलटवार

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**केंद्र सरकारने भारत-चीन सीमा वाद आणि अमेरिकेचे समन्यायी व्यापार कर हे दोन विषय ज्या प्रकारे हाताळले, त्यावर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली आहे. या टीकेनंतर भाजपाचे नेते अनुराग ठाकूर यांनी राहुल गांधींवर पलटवार केला. राहुल गांधी आपल्या भाषणादरम्यान म्हणाले, परकीय शक्तीसमोर गुडघे टेकणे हे भाजपाची जुनी पद्धत आहे. सीमेवर परिस्थिती सामान्य राहावी याच्या विरोधात आम्ही नाही. मात्र हे तत्व दोन्ही बाजूंनी पाळायला हवे. आम्हाला वाटते आपली जी जमीन चीनने बळकावली आहे, ती परत मिळायला हवी.**





राहुल गांधी म्हणाले, राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी चीनच्या राजदूतांना पत्र लिहिल्याचे मला कळले. पण ही माहिती आपल्या लोकांकडून नाही तर चीनच्या राजदूतांकडून आम्हाला कळली.

भारत-चीन सीमेवरील संघर्षाबाबत बोलताना राहुल गांधी म्हणाले, “चीनने भारताचा ४,००० एकरचा प्रदेश गिळंकृत केला आहे. चीनशी संघर्ष करताना आपले २० जवान शहीद झाले आहेत आणि आपण चीनबरोबर केक कापत आहोत.”अमेरिकेच्या व्यापारकराबाबत बोलताना राहुल गांधी म्हणाले की, आमच्या मित्र राष्ट्राने आपल्यावर आयातशुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आपण उध्वस्त होऊ शकतो. एकीकडे आपली जमीन बळकावली जात आहे आणि दुसरीकडे आपल्यावर आयातशुल्क आकारले जात आहे, याबद्दल केंद्र सरकार काय करत आहे.राहुल गांधींच्या टिकेला उत्तर देताना केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, जे लोक भारत आणि चीनच्या विषयाबाबत सभागृहात बोलत आहेत. तेच चीनी लोकांबरोबर एकत्र बसून सूप पितात. तसेच भारताची एक इंचही जमीन चीनने घेतलेली नाही, असेही त्यांनी सांगितले. अनुराग ठाकूर पुढे म्हणाले, “चीनने भारताच्या प्रदेशाचा ताबा कुणाच्या काळात घेतला होता? राजीव गांधी फाउंडेशनने चीनी अधिकाऱ्यांकडून पैसे का घेतले? अक्साइ चीनला चीनने कसे काय बळकावले आणि काँग्रेस हातावर हात ठेवून त्या काळी कशी काय बसली?”चित्रपटांमध्ये आपण जसे गुंड पाहतो ना? एखाद्या स्त्रीवर हात ठेवतात ती त्यांची होते असं दाखवलं जातं. अगदी त्याच प्रकारे या वक्फ बोर्डांनी भू माफियांसाठी काम केलं आहे. ज्या जमिनीवर हात ठेवला ती जमीन यांची झाली.

### काय म्हणाले राधामोहन अग्रवाल?

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एका बैठकीत सगळ्या खासदारांना हे बजावून सांगितलं होतं की तुम्ही जेव्हा काम करता तेव्हा हिंदू-मुस्लिम कधीही करु नका. विकसाची गंगा प्रत्येकाच्या दारात जाईल याची काळजी घ्या. या लोकांनी काय केलंय माहीत आहे का? ती जागा आहे बघा जिथे ओवैसी बसतात. त्यांनी माझं नाव मौलाना राधा मोहन अग्रवाल असं ठेवलं आहे. मला सांगा यापेक्षा माझा मोठा सन्मान काय असेल? हजरत मोहम्मद यांनी त्यांच्या आयतांमध्ये लिहिलं आहे की एक पैसा ही कुणाला दिला तर ते लिहून ठेवा. त्यासाठी साक्षीदार ठेवा, तुम्हाला त्यावरुन कुणी आव्हान देता कामा नये.

मी तुम्हाला सगळं सांगू शकतो की यांनी लूट कशी केली आहे. सय्यद नासीर हुसैन हे राज्यसभेचे खासदार झाले. मी त्यावेळी कर्नाटकमधल्या बंगळुरुत होतो. त्यावेळी विधानसभेत पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा झाल्या होत्या. भाजपाने याला विरोध दर्शवला तेव्हा भाजपाच्या कार्यकर्त्यांना तुरुंगात धाडण्यात आलं. विधवा मुस्लिम भगिनींसाठी ऐतिहासिक दिवस आहे. वक्फ सुधारणा विधेयकात आज क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. आम्ही हिंदू आहोत आणि आम्ही सातत्याने आमच्या समाजात परिवर्तन करतो. आम्ही कायमच समाजातील दुष्ट प्रवृत्तींच्या विरोधात संघर्ष केला आहे. आमच्या धर्मात सती प्रथा होती ती बंद करण्यासाठी आम्ही कायदा आणला याची साक्ष इतिहासात आहे. एवढंच नाही तर आम्ही बालविवाहाच्या विरोधात कायदा आणला. मला आश्चर्य वाटतं की ७५ वर्षांत मुस्लिम समाजासाठी अशा प्रकारच्या सुधारणा का झाल्या नाहीत? गरीब मुस्लिमांचं आयुष्य सुधारावं यासाठी कुठल्याही सुधारणा आणणं सोडा सुचवल्याही गेल्या नाहीत.

---

# कोल्हापूरच्या महादेव मंदिरावर वक्फचा दावा

## वक्फने दावा केलेला नाही : मुस्लीम ग्रामस्थांचं स्पष्टीकरण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**लोकसभेत बुधवारी (२ एप्रिल) वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झालं. तत्पूर्वी सभागृहात झालेल्या चर्चेवेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे गावातील महादेव मंदिराचा उल्लेख केला. या मंदिराच्या जागेवर वक्फ बोर्डाने दावा केल्याचं अमित शाह यांनी सांगितलं. तसेच हे मंदिर गेल्या अनेक वर्षांपासून त्या जागेवर आहे, असंही सांगितलं. दरम्यान, या गावातील हिंदू व मुस्लीम ग्रामस्थांनी आपापल्या भूमिका मांडल्या आहेत.**




वडणगे गावातील एक ग्रामस्थ एबीपी माझाला म्हणाले, “या महादेव मंदिराचं मोठं महात्म्य आहे. करवीर ग्रंथातही त्याचा उल्लेख आहे. करवीर ग्रंथात या गावाला वडणगे करवीर काशी असं म्हटलं आहे. मात्र, आता वक्फ बोर्ड या परिसरावर दावा करत आहे. वक्फ बोर्डाला ही जागा हवी आहे. वक्फ बोर्ड स्वतःची मालकी सांगून मंदिराची जागा हस्तगत करू शकतं.दरम्यान, गावातील एका मुस्लीम ग्रामस्थाने म्हटलं आहे की आजवर वक्फने या पवित्र मंदिराच्या जागेवर दावा केलेला नाही.

माझ्या मित्राने जो दावा केला आहे किंवा काही मंडळी तथाकथित दावा करत आहेत त्यांनी असे अधिकृत दस्तऐवज दाखवावे. वक्फने या जागेवर दावा केल्याचा कागदी पुरावा दाखववा. मुळात मंदिराची मालमत्ता सिटी सर्वेक्षण क्रमांक ११७ मध्ये आहे. तर मुस्लीम समुदायाची मिळकत सिटी सर्वेक्षण क्रमांक ८९ मध्ये आहे. दोन्ही मिळकती भिन्न आहेत.गावातील आणखी एका तरुणाने यावर भाष्य केलं आहे.

### मंदिरावर दावा केलेला नाही

करवीर ग्रंथात या गावाला वडणगे करवीर काशी असं म्हटलं आहे. मात्र, आता वक्फ बोर्ड या परिसरावर दावा करत आहे. वक्फ बोर्डाला ही जागा हवी आहे. वक्फ बोर्ड स्वतःची मालकी सांगून मंदिराची जागा हस्तगत करू शकतं.दरम्यान, गावातील एका मुस्लीम ग्रामस्थाने म्हटलं आहे की आजवर वक्फने या पवित्र मंदिराच्या जागेवर दावा केलेला नाही.

तो म्हणाला, “ही जागा वडणगे गावची आहे. मंदिराचा परिसर ग्रामपंचायतीच्या मालकीचा आहे. शासकीय कागदपत्रांवर ग्रामपंचायत वडणगे असाच उल्लेख आहे. या जागेवर मुस्लीम समाजाने वक्फ बोर्डाचं नाव लावलेलं. परंतु, दिवाणी न्यायालयाने ते रद्द केलं आहे. या जागेवर जत्रा भरते.अमित शाह म्हणाले, “यूपीएच्या काळात हरियाणातील १४ गावे वक्फला दिली आहेत. प्रयागराजमधील चंद्रशेखर आझाद पार्क वक्फला दिलं आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूरमधील वडणगे गावात महादेवाचं जुनं मंदिर आहे. त्या मंदिरावर वक्फने दावा केला आहे. बीडमध्ये कंकाळेश्वर मंदिराची १२ एकर जमीन आहे ती देखील वक्फने घेतली आहे.”वडणगे गावातील एक ग्रामस्थ एबीपी माझाला म्हणाले, “या महादेव मंदिराचं मोठं महात्म्य आहे. करवीर ग्रंथातही त्याचा उल्लेख आहे.

# आर. माधवनने घेतलेला अभिनयातून ब्रेक!

'३ इडियटस', 'शैतान', अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांतील अभिनयासाठी आर. माधवन(R MADHAVAN) ओळखला जातो. त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. बॉलीवूडसह तो तमीळ चित्रपटांतही काम करतो. मात्र, अभिनेत्याच्या आयुष्यात अशी एक वेळ आली होती, ज्यावेळी आर. माधवनने अभिनयातून ब्रेक घेतला होता. एका मुलाखतीत त्याने अभिनयातून ब्रेक घेण्याचे कारणही सांगितले होते. त्याने हा निर्णय घेण्यास एक घटना कारणीभूत असल्याचाही खुलासा केला होता.आर. माधवनने 'इंडिया टीव्ही'ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले, "मी ब्रेक घेतला. कारण- ज्या प्रकारचे मी चित्रपट करीत होतो, त्यामुळे माझी निराशा झाली होती. मी तमीळ गाण्याचे स्वित्झर्लंडमध्ये शूटिंग करीत होतो. केसरी रंगाची पँट आणि हिरव्या रंगाचा शर्ट घातला होता. मी गाण्यावर डान्स करीत होतो. त्या गाण्याच्या शूटिंगवेळी मी रस्त्याच्या मधोमध होतो. तिथे एका शेतकऱ्याने माझ्याकडे तिरस्काराने बघत नकारार्थी मान हलवली. मी त्याच्याकडे पाहिले आणि त्याला म्हणालो की, चेन्नईला ये, मी तुला दाखवतो की, मी कोण आहे. मला खूप राग आला; पण ही गोष्ट माझ्या डोक्यात राहिली. त्या घटनेनंतर मला याची जाणीव झाली की, मी इतरांच्या तालावर नाचत आहे. मला याची जाणीव झाली की, आयुष्यात अनेक गोष्टी करू शकतो; पण मी त्या चित्रपटात दाखवत नाही. मी काही लोकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होतो. मला पैशाची कमतरता नव्हती किंवा मी अशिक्षितही नव्हतो.

# मला मुलींसारखे कपडे घालायची परवानगी नव्हती

करण जोहरच्या 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' आणि अलीकडेच नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'डब्बा कार्टेल' चित्रपटामुळे अभिनेत्री अंजली आनंद घराघरांत लोकप्रिय झाली. 'रॉकी और रानी...' चित्रपटात अंजली आनंदने रणवीर सिंहच्या बहिणीची भूमिका साकारली होती. तिने नुकतीच एका पॉडकास्टला उपस्थिती लावली होती. यावेळी अभिनेत्रीने तिच्या आयुष्यातील एक धक्कादायक अनुभव सांगितला. अभिनेत्री अंजली आनंद 'हॉटरफ्लाय'ला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली, "मी फक्त ८ वर्षांची होते... यापूर्वी मी ही गोष्ट कुठेच बोलले नाहीये. ही घटना माझ्या वडिलांच्या निधनानंतर घडली होती. मला माझ्या डान्स टिचरने सांगितलं, तो माझ्या वडिलांसारखा आहे. मी सुद्धा त्याच्यावर विश्वास ठेवला कारण, फक्त ८ वर्षांच्या मुलीला काय कळणार आहे... मग त्याने हळूहळू सुरुवात केली. आधी माझ्या गालावर किस केलं, त्यानंतर ओठांवर किस केलं आणि म्हणाला, 'वडील असेच करतात'... त्यावेळी एका वडील आणि मुलीचं नातं कसं असतं हे सुद्धा मला माहिती नव्हतं. कारण, मला खेळणी, चॉकलेट वगैरे हवं असेल किंवा आणखी काही हवं असेल तर तो मला द्यायचा."अभिनेत्री पुढे म्हणाली, "हे सगळं अनेक वर्षे सुरू होतं. तो मला केस मोकळे ठेवायला द्यायचा नाही. मला मुलींसारखे कपडे घालायची परवानगी नव्हती. मी त्याचे जुने कपडे, त्याचे जुने शर्ट घालायची. जेणेकरून कोणत्याच मुलाने माझ्याकडे पाहू नये अशी त्याची अपेक्षा होती. यादरम्यान माझ्या बहिणीचं लग्न झालं. तेव्हा माझ्या वडिलांच्या मित्राचा मुलगा माझ्या बहिणीच्या लग्नाला आला होता.

# आईचा आवाज गेला :रिया चक्रवर्ती



दिवंगत बॉलीवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतचे (SUSHANT SINGH RAJPUT) १४ जून २०२० आकस्मिक निधन झाले. त्याच्या निधनाच्या वृत्ताने सर्वांनाच मोठा धक्का बसला. अभिनेत्याची हत्या झाली की त्याने आत्महत्या केली याबद्दल चौकशी झाली. अशातच काही दिवसांपूर्वी, सीबीआयने मुंबई न्यायालयात या प्रकरणाशी संबंधित क्लोजर रिपोर्ट दाखल केला, ज्यामध्ये ही आत्महत्या असल्याचे म्हटलं गेलं. तसंच याप्रकरणी सीबीआयने अभिनेत्री रिया चक्रवर्तीलाही (RHEA CHAKRABORTY) क्लीन चिट दिली. पण या संपूर्ण काळात रिया तसंच तिच्या कुटुंबियांच्या कुटुंबावर खूप मोठा आघात झाला. या काळात रिया तसंच तिच्या कुटुंबियांना संघर्षमय परिस्थितीतून जावे लागले. याबद्दल रियाची मैत्रीण निधी हिरानंदानीने 'स्क्रीन'च्यामुलाखतीत भाष्य केलं आहे. या संपूर्ण प्रकरणात रियाचे कुटुंब कसे एकटे पडले होते? आणि त्यांचे आयुष्य कसे उद्ध्वस्त झाले होते याबद्दल सांगितले. या आरोपांमुळे रिया आणि शोविक (रियाचा भाऊ) दोघांनीही त्यांच्या आयुष्यातली मौल्यवान वर्षे गमावली. तसंच निधी हिरानंदानीने रिया आणि सुशांत सिंह राजपूत यांच्या नात्याबद्दलही भाष्य केलं.निधीने रियाच्या मीडिया ट्रायलमधील संघर्षाची आठवण सांगताना म्हटलं की, "जेव्हा रिया बाहेर आली तेव्हा सर्व पत्रकार तिच्यावर तुटून पडले होते. त्या दिवशी ती घरी आली तेव्हा तिच्या हातावर आणि चेहऱ्यावर जखमा होत्या. तेव्हा मला पूर्णपणे असहाय्य वाटत होते.

# जालियनवाला बाग हत्याकांडचं सत्य

अक्षय कुमार, आर. माधवन व अनन्या पांडे यांच्या दमदार भूमिका असलेला बहुचर्चित 'केसरी २' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला झाला आहे. तीन मिनिटं दोन सेकंदांचा हा ट्रेलर तुमचे मन हेलावून टाकेल. यावेळी अक्षय अमृतसरमध्ये घडलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची कधीही न ऐकलेली कहाणी पडद्यावर आणत आहे, जी पाहून अनेकांचे डोळे पाणावतील. दर वेळी आपल्या धमाकेदार कहाण्या रुपेरी पडद्यावर आणणारा अक्षय कुमार यावेळी ब्रिटिश राजवटीत अमृतसरमध्ये घडलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची कहाणी घेऊन आला आहे. 'केसरी चॅप्टर २' या चित्रपटामध्ये अक्षय कुमार सी. शंकरन नायर यांची भूमिका साकारत आहे, ज्यांनी १९१९ मध्ये जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढा दिला होता. तर, आर. माधवन ब्रिटिश साम्राज्याच्या वकिलाची भूमिका साकारत असून, तो अक्षय कुमारबरोबर न्यायालयात संघर्ष करताना दिसेल. तसेच चित्रपटात अनन्या पांडेचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे.ट्रेलरच्या सुरुवातीला अक्षय जनरल डायरला तुम्ही जमावाला रोखण्यासाठी काय केलंत? अश्रुधूर सोडला का? हवेत गोळीबार केला का?, असं विचारतो. त्यानंतर जनरल डायर उत्तर देत म्हणतो की, तो जमाव नसून ते दहशतवादी होते. त्यावर अक्षय "आठ-नऊ-अकरा वर्षांच्या मुलांच्या छातीवर गोळ्या लागल्या, त्यांच्या हातात कोणते शस्त्र होते? हातातले कडे की बंद मूठ, असा प्रश्न विचारतो. या संवादांनी ट्रेलरची सुरुवात होते. पुढे जालियनवाला बाग हत्याकांडाची दृश्यं दाखवली जातात. अक्षयचे यापूर्वीचे अनेक चित्रपट फ्लॉप झाले आहेत. त्यामुळे अक्षय कुमारनं 'केसरी-२'मधून जोरदार कमबॅक केलं असल्याचं ट्रेलरवरून तरी दिसत आहे. 'केसरी'मध्ये अक्षय कुमारनं हवालदार ईश्वर सिंहची भूमिका साकारली होती. त्यात सारागढीच्या लढाईचं चित्रण होतं, ज्यामध्ये २१ शिखांनी आपले प्राण दिले होते. हा चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता.

# 'सिकंदर'च्या कमाईत चौथ्या दिवशी मोठी घट!

सलमान खानच्या 'सिकंदर' सिनेमाकडून त्याच्या चाहत्यांसह चित्रपट समीक्षकांना देखील भरपूर अपेक्षा होत्या. या सिनेमातून भाईजानने बॉक्स ऑफिसवर दीड वर्षांनी पुनरागमन केलं आहे. त्यामुळे 'बजरंगी भाईजान', 'सुलतान' या सिनेमांप्रमाणे 'सिकंदर' पाहण्यासाठी सुद्धा प्रेक्षक मोठ्या संख्येने गर्दी करतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, 'सिकंदर'च्या पदरी पहिल्या दिवसापासून निराशा आली आहे. 'सिकंदर' पहिल्याच दिवशी ग्रँड ओपनिंग करेल असा विश्वास स्वत: सलमानला देखील होता. मात्र, या सिनेमाने पहिल्या दिवशी केवळ २६ कोटींची कमाई केली. याउलट फेब्रुवारी महिन्यात प्रदर्शित झालेल्या विकी कौशलच्या 'छावा' सिनेमाने कमी शो मिळूनही बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी तब्बल ३३.१ कोटींचा गल्ला जमावला होता. 'सिकंदर'ला त्या तुलनेत संपूर्ण देशभरात शोज देखील जास्त मिळाले होते.दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी 'सिकंदर'ने अनुक्रमे २९ व १९.५ कोटींची कमाई केली. 'सिकंदर'च्या तिसऱ्या दिवशीच्या कमाईत तब्बल ३२ टक्क्यांची घट पाहायला मिळाली होती. त्यामुळे चौथ्या दिवशी हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर काय कामगिरी करणार याकडे सर्वांचं लक्ष होतं.सलमान खानच्या 'सिकंदर'ला चौथ्या दिवशी बॉक्स ऑफिसवर १० कोटी देखील कमावता आलेले नाहीत. या चित्रपटाने चौथ्या दिवशी फक्त ९.७५ कोटींचा गल्ला जमावला असल्याचं वृत्त 'सॅकनिल्क'ने दिलेलं आहे. कलेक्शनची एवढी कमी आकडेवारी ऐकून भाईजानच्या सगळ्याच चाहत्यांना धक्का बसला आहे. सिनेमाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये चौथ्या दिवशी तब्बल ५० टक्क्यांनी घट झाली आहे. आतापर्यंत म्हणजे प्रदर्शित झाल्यापासून गेल्या ४ दिवसांमध्ये 'सिकंदर'ने ८४.२५ कोटींचा गल्ला जमावला आहे. सिनेमाला अद्याप आपलं मूळ बजेट अर्धही वसूल करता आलेलं नाही. 'सिकंदर'चं मूळ बजेट २०० कोटी आहे आणि सध्याची परिस्थिती पाहता सलमानच्या सिनेमाला १०० कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री घेताना देखील मोठी कसरत करावी लागणार आहे.दरम्यान, 'सिकंदर' सिनेमाबद्दल सांगायचं झालं, तर यामध्ये सलमान खान व रश्मिका मंदाना यांच्यासह शर्मन जोशी, प्रतिक बब्बर, काजल अग्रवाल, सत्यराज यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. या सिनेमाचं दिग्दर्शन ए. आर. मुरुगादोस यांनी केलं आहे.सलमान खानच्या 'सिकंदर' सिनेमाकडून त्याच्या चाहत्यांसह चित्रपट समीक्षकांना देखील भरपूर अपेक्षा होत्या. या सिनेमातून भाईजानने बॉक्स ऑफिसवर दीड वर्षांनी पुनरागमन केलं आहे. त्यामुळे 'बजरंगी भाईजान', 'सुलतान' या सिनेमांप्रमाणे 'सिकंदर' पाहण्यासाठी सुद्धा प्रेक्षक मोठ्या संख्येने गर्दी करतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, 'सिकंदर'च्या पदरी पहिल्या दिवसापासून निराशा आली आहे. 'सिकंदर' पहिल्याच दिवशी ग्रँड ओपनिंग करेल असा विश्वास स्वत: सलमानला देखील होता. मात्र, या सिनेमाने पहिल्या दिवशी केवळ २६ कोटींची कमाई केली.



# हैदराबादचा इतिहासातील मोठा पराभव!

## केकेआरने मिळवला दणदणीत विजय; हेड-अभिषेक-क्लासेन फेल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज ।

**कोलकाता नाईट रायडर्स संघाने ईडन गार्डन्सच्या मैदानावर पुन्हा एकदा सनरायझर्स हैदराबादला पराभवाचा मोठा धक्का दिला आहे. हैदराबादला केकेआरने ८० धावांनी सर्वात मोठा विजय मिळवला आहे. हैदराबादचा आयपीएल इतिहासातील हा सर्वात मोठा पराभव आहे. इतक्या मोठ्या धावसंख्येच्या फरकाने पहिल्यांदाच पराभूत झाला आहे. केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ अवघ्या १२० धावांवर १६.४ षटकांत सर्वबाद झाला.**



कोलकाताचा चार सामन्यांमध्ये हा दुसरा विजय आहे. तर हैदराबादने सलग तिसरा सामना गमावत पराभवाची हॅटट्रिक साधली आहे. पुन्हा एकदा केकेआरने हैदराबादच्या सलामीवीरांना माघारी धाडलं आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. हैदराबादची टॉप ऑर्डर कोसळल्यानंतर संघ पुन्हा सावरू शकला नाही आणि परिणामी त्यांना मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं.केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघाची सुरूवात इतकी खराब झाली की संघ शेवटपर्यंत या धक्क्यांमधून सावरू शकला नाही. केकेआरकडून इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या वैभव अरोराने पहिल्याच षटकात कहर केला. त्याच्या पहिल्या चेंडूवर हेडने चौकार मारला आणि पुढच्याच चेंडूवर त्याला झेलबाद करवत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हर्षित राणाने अभिषेक शर्माला २ धावांवर असताना झेलबाद केलं. तर इशान किशनही झेलबाद झाला.नितीश कुमारने पुन्हा एकदा निराश केलं आणि तो १९ धावा करत बाद झाला. तर कामिंदु मेंडिस २७ धावा, हेनरिक क्लासेनने ३३ धावांची सर्वात मोठी खेळी केली पण तो संघाला शेवटपर्यंत थांबत विजयापर्यंत नेऊ शकला नाही. तर पॅट कमिन्स १४ धावा करत बाद झाला. केकेआरच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजीवर आळा घातला. वैभव अरोरा आणि वरूण चक्रवर्ती यांनी ३-३ विकेट घेतले. तर आंद्र रसेलने २ विकेट तर हर्षित राणा आणि सुनील नरेनने १ विकेट घेतली.तत्पूर्वी नाणेफेक गमावत केकेआरचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. केकेआरची सुरूवातही खराब झाली होती. क्विंटन डि कॉक आणि सुनील नरेन स्वस्तात बाद झाले होते. पण अजिंक्य रहाणे आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्या भागीदारीने संघाचा डाव सावरला. अंजिक्य रहाणेने २७ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तर अंगक्रिश रघुवंशीने ३२ चेंडूत ५ चौकार आणि २ षटकारांसह ५० धावांची खेळी केली. वेंकटेश अय्यर जो सुरूवातीच्या सामन्यांमध्ये फेल ठरला होता त्याने या सामन्यात २९ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांच्या मगतीने ६० धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर रिंकू सिंग १७ चेंडूत ४ चौकार आणि एका षटकारासह ३२ धावा करत नाबाद परतला. रिंकू आणि वेंकटेशने मिळून अखेरच्या ४ षटकांमध्ये ६६ धावा केल्या. हैदराबादकडून शमी, कमिन्स, झीशान अन्सारी, हर्षल पटेल आणि कामिंदू मेंडिस यांनी १-१ विकेट घेतली. या पराभवासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत अखेरच्या स्थानी पोहोचला.कोलकाताचा चार सामन्यांमध्ये हा दुसरा विजय आहे. तर हैदराबादने सलग तिसरा सामना गमावत पराभवाची हॅटट्रिक साधली आहे. पुन्हा एकदा केकेआरने हैदराबादच्या सलामीवीरांना माघारी धाडलं आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. हैदराबादची टॉप ऑर्डर कोसळल्यानंतर संघ पुन्हा सावरू शकला नाही आणि परिणामी त्यांना मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं.

### नितीश कुमारने पुन्हा निराश केलं

केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघाची सुरूवात इतकी खराब झाली की संघ शेवटपर्यंत या धक्क्यांमधून सावरू शकला नाही. केकेआरकडून इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या वैभव अरोराने पहिल्याच षटकात कहर केला. त्याच्या पहिल्या चेंडूवर हेडने चौकार मारला आणि पुढच्याच चेंडूवर त्याला झेलबाद करवत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हर्षित राणाने अभिषेक शर्माला २ धावांवर असताना झेलबाद केलं. तर इशान किशनही झेलबाद झाला.नितीश कुमारने पुन्हा एकदा निराश केलं आणि तो १९ धावा करत बाद झाला. तर कामिंदु मेंडिस २७ धावा, हेनरिक क्लासेनने ३३ धावांची सर्वात मोठी खेळी केली पण तो संघाला शेवटपर्यंत थांबत विजयापर्यंत नेऊ शकला नाही. तर पॅट कमिन्स १४ धावा करत बाद झाला. केकेआरच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजीवर आळा घातला.

# ‘राहुल’ प्रकरणाची संजीव गोयंकांकडून पुनरावृत्ती

## पराभवानंतर संजीव गोयंका कर्णधार ऋषभ पंतवरही रागावले?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएलच्या इतिहासातील दुसरा सर्वात महागडा खेळाडू ठरलेला ऋषभ पंत अद्याप आपल्या कामगिरीने प्रभावित करण्यात अपयशी ठरला आहे. लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार असलेला ऋषभ पंत सुरूवातीच्या तिन्ही सामन्यात चांगली कामगिरी करू शकला नाहीये. त्याच्या नेतृत्वावर देखील प्रश्न उभारले जात आहेत. लखनौ संघाला सुरूवातीच्या तीन सामन्यांपैकी एकाच सामन्यात विजय मिळवता आला आहे.**



पंजाबविरूद्धच्या पराभवानंतर लखनौ संघाचे मालक संजीव गोयंका पंतवरही संतापताना दिसले.मंगळवारी १ एप्रिलला लखनौ सुपर जायंट्सला त्यांच्या घरच्या मैदानावर पंजाब किंग्जकडून पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करताना लखनौचा संघ १७१ धावा करू शकला. प्रत्युत्तरात पंजाबने १६.२ षटकांत लक्ष्य गाठले आणि ८ गडी राखून मोठा विजय नोंदवला. सामना संपल्यानंतर संजीव गोयंका ऋषभ पंतसह मैदानात उभे असताना दिसले. संघाच्या पराभवानंतर संजीव गोयंका नाराज दिसत होते. ते ऋषभ पंतला हातवारे करूनही काहीतरी सांगताना दिसले. सामना संपल्यानंतर संजीव गोयंका मैदानावर ऋषभ पंतशी बोलत असताना गोयंका यांनी गतवर्षीच्या राहुल प्रकरणाची पुनरावृत्ती केल्याची चर्चा सोशल मीडियावर केली आहे. गेल्या वर्षी संघ सनरायझर्स हैदराबादविरूद्ध पराभूत झाल्यानंतर संजीव गोयंका राहुलवर भर मैदानात संतापले होते. त्यानंतर संजीव गोयंका यांच्यावर बरीच टीका झाली होती. गोयंका मंगळवारी ऋषभ पंतला काय म्हणाले, हे माहित नसलं तरी संघाच्या कामगिरीने ते आनंदी नसल्याचे दिसत होते. लखनौला दिल्ली कॅपिटल्स संघाविरूद्ध अखेरच्या षटकात पराभव पत्करावा लागला, तेव्हा ही गोयंका पंतशी बोलताना दिसले होते. दुसऱ्या सामन्यात लखनौने लखनौने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध विजय मिळवून पुनरागमन केले. यानंतर ते पंतला मिठी मारताना दिसले, मात्र मंगळवारी संघाला पंजाबविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. यानंतर मात्र संजीव गोयंका पंतवर वैतागताना फोटोमध्ये दिसल्याची सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे.

### पंत खराब फॉर्मशी झुंजत आहे

चाहत्यांनी लखनौच्या मालकांवर टीका केली आहे.लखनौ सुपर जायंट्ससाठी चिंतेची बाब म्हणजे त्यांचा कर्णधार ऋषभ पंत खराब फॉर्मशी झुंजत आहे. पंजाब किंग्जविरुद्धही तो केवळ २ धावा करून बाद झाला होता. पहिल्या सामन्यात १५ धावा करणाऱ्या पंतला दुसऱ्या सामन्यात खातेही उघडता आले नाही.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। शुक्रवार ।
। दि. 4 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पीसीसीओईला राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार

## शिक्षण विश्व: आयपी पुरस्कार मिळवणारी पीसीसीओई राज्यातील एकमेव खासगी संस्था

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला प्रतिष्ठेचा राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार मिळाला आहे.**

नवी दिल्ली मध्ये भारत मंडपम येथे आयोजित केलेल्या भव्य सभारंभात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते पीसीसीओईच्या प्रतिनिधींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. भारतीय पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक यांच्याद्वारे आयोजीत केलेल्या भव्य सभारंभात हा प्रतिष्ठित पुरस्कार पीसीसीओईचे पेटंट कक्ष अधिकारी डॉ. उज्वल शिरोडे आणि प्रा.अजय एस. गाढे यांनी स्वीकारला.



राष्ट्रीय बौद्धिक संपदा (आय. पी.) पुरस्कार दरवर्षी आयपी निर्मिती आणि व्यापारीकरणात दिलेल्या सर्वोत्तम योगदानाबद्दल व्यक्ती, संस्था किंवा उद्योगसमूह यांना देण्यात येतो. भारतातील बौद्धिक संपदा (इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी) क्षेत्रात नाविन्यपूर्ण, सर्जनशील कामगिरी करून बौद्धिक संपदेच्या वाढीसाठी योगदान देणे हे या पुरस्कारामागील उद्दिष्ट आहे.

पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने आपल्या पेटंट सुविधा कक्षाच्या (पीएफसी सेल) अंतर्गत एकूण ६५ पेटंट अर्ज यशस्वीरित्या दाखल केले आहेत, त्यापैकी २४ पेटंट मंजूर झाले आहेत. तसेच उर्वरित पेटंट गेल्या ३ वर्षांत यशस्वीरित्या प्रकाशित झाले आहेत. पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ही महाराष्ट्रातील एकमेव खाजगी संस्था ज्यांना यंदाच्या पुरस्कार्थी यादीत स्थान मिळाले आहे.

प्रतिष्ठेचा राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार मिळाल्याबद्दल पेटंट सुविधा कक्षाचे डॉ. प्रमुख उज्वल शिरोडे आणि प्रा.अजय गाढे तसेच पेटंट दाखल करणाऱ्या प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे संचालक डॉ.गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ.नीलकंठ चोपडे यांच्यासह पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले आहे.



# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch 2024-25

ADMISSION OPEN

## Second Batch

From 5th April 2025

Duration One Month

1 Hour /day

Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab

Registration started

Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

# 2025-26 ADMISSIONS OPEN

## PRIYADARSHANI SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

86687 55826

98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA
Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

# BBA



**Bachelor of Business Administration**

# BCA



**Bachelor of Computer Applications**

## Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
CREATIVE
Where There is Creativity, There is Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com